भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०७/२०१७

**१) प्राण्यांचे मास विक्री करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०७/२०१७ चे १०.३० ते ११.०० वा. दर. यातील गुप्त माहिती व्दारे मिळालेल्या खबरेवरुन यातील आरोपी याचे किरायाचे घराची प्राण्याची कत्तल करुन मास विक्रीबाबत झडती घेतली असता त्याचे घरासमोरील अंगणात मास विक्री करतांना मिळुन आला त्याचे जवळुन ०१ चुंगडीमध्ये २० किलो प्राण्यांचे मास किंमती २,०००/—रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. महालगावे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९ भांदवि. सहकलम ५(क),९(अ) महा प्राणि. संरक्षण का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन डोक्यावर टिकास मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०७/२०१७ चे १३.३० चे. दर. यातील फिर्यादी पाडुरंग मोतीराम बिल्लोरे वय ५४ वर्ष, रा. सुभाष वार्ड माडगी याचे घराचे भिंती जवळ आरोपीने विटा रचुन ठेवल्याने फिर्यादीने त्यास विटा रचुन ठेवल्या मी कुठुन जाणार असे हटकले असता आरोपीने तोंडातोंडी भांडण, शिवीगाळ करुन फिर्यादीचे डोक्यावर टिकास मारुन जखमी केल्याने फिर्यादी बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्यशने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०९/२०१७ ते १०.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी रामदास महादेव रामटेके वय ६२ वर्ष, रा. वासेरा व त्याची पत्नी सौ. पुष्पा हिला सार्वजनिक रोडवर अश्लिल लज्जास्पद शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी सा. कोर्ट पवनी यांचे केस क्र. ६१/१७ क्र.१५६(३)जाफौ चे आदेशावरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ५०९,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यान आला. पुढील तपास सफौ. गिऱ्हेपुंजे हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०७/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील अल्पवयीन फिर्यादी मुलगी ही आपले मित्रा सोबत गेली असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे मित्रास तेथुन जाण्यास सांगुन फिर्यादीस तुझे फोटो काढले आहे व्हॉटस्‌अप वर टाकीन व तुझ्या आईला दाखवीन अशी धमकी देऊन गाडीवर बसवुन गेले व तिचे मांडीवर हात फिरवुन तिचा वियभंग केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३६३,३५४(ड),५०६,३४ भांदवि. सहकलम ८,१२ बा.लै.अ.प्र.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे ईरादयाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०७/२०१७ चे ००.३० वा. दर. यातील आरोपी हा अंधारात स्वतःचे अस्तित्व लपवुन भावड गावात अंधारामध्ये राईसमिल जवळ दखलपात्र गुन्हा करण्याचे ईरादयाने मिळुन आल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. सतदेवे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

६) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

**अ)** दिनांक १३/०७/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील मृतक रविंद्र श्रीधर ब्राम्हणकर वय ४२ वर्ष, रा. खंदार विरली याने कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करिता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे डॉक्टरी मेमो वरुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोलीस कॉन्सटेबल घनमोडे पोस्टे अडयाळ यांनी आणुन पेश केल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १३/०७/२०१७ चे १६.३० वा. दर. यातील मृतक टिकाराम दोडकु भुरे वय ४० वर्ष, रा. आकोट याने कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करिता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे डॉक्टरी मेमो वरुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोलीस कॉन्सटेबल घनमोडे पोस्टे अडयाळ यांनी आणुन पेश केल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

७) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १४/०७/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील टाटा सुमो क्र. एमएच ४० ए २४७४ ही आमरोडवर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

८) अवैध दारु अडयावर धाडी . :–

दिनांक १४/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, करडी, तुमसर, लाखणी व अडयाळ येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४८ लिटर हातभट्टी ५ किलो सडवा + साहित्य किंमती ५,८००/–रु. ०१ लिटर ८० मिली लिटर देशी किमती ३००/–रु. चा असा एकुण ६,१००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १४/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती २५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२१ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.